<u>नि.दि.दावा क्र.१०४/२०२३ मधील नि.क्र.३६ व ४६ वरील संयुक्त आदेश</u>

(<u>पारित दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५</u>)

प्रस्तुतचा अर्ज निशाणी ३६ हा प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी 'दिवाणी प्रक्रिया संहिता' आदेश ७ नियम ११(ड) अन्वये वादीचा दावा फेटाळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. सदर प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेबाबत, जाहीर ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. सदर प्रकरणातील दावा मिळकत ही प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत असुन ती प्रतिवादी क्र.१ व ५ यांना जिरायत असल्यामुळे उत्पन्न घेणे अडचणीचे होत होते. सदर मिळकतीपासुन उत्पन्न नसल्याने, कर्ज व बोजा झाल्याने, इतरत्र सोयीची मिळकत घ्यावी या कारणांचा विचार करुन प्रतिवादी क्र.१ यांनी सदरची मिळकत विक्रीस काढली असता सदरची बाब वादींना समजली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी दि.०४/०७/२००६ रोजी रक्कम रु.४,६०,०००/- एवढा मोबदला स्वीकारुन रजिस्टर दस्त नं.२२६३/२००६ अन्वये बिनताबा साठेखत प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी वादी यांना करुन दिले.

०३. सदर प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे म्हणणेनुसार सदरची मिळकत ही भोगवटदार वर्ग -२ ची असल्यामुळे सदर मिळकतीची विक्री परवानगी आणणेकामी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे वादीने महसुल कार्यालयात जमा केली. त्यानंतर सदर मिळकतीची विक्री परवागी घेणेसाठी जिल्हाधिकारी, पुणे, महसुल शाखा यांच्याकडे अर्ज दिला. दरम्यानच्या काळात सदर मिळकत ही फॉरेस्ट संवर्गात असली तरी सदर मिळकतीचे निर्वाणीकरण झाल्याने उप-संरक्षक वनविभाग, पुणे यांनी सदर मिळकतीचे निर्वाणीकरण झाल्याचा दाखला जिल्हाधिकारी, पुणे,

महसुल शाखा यांना दिला. त्यानंतर जिल्हाधिकारी, पुणे महसुल कार्यालयातुन क्र.पमफ/कावी/०८/२०१७, दि.०५/०१/२०१७ अन्वये वादी यांना ७५ टक्के नजराणा रु.६,३६,१६१/– एवढी रक्कम भरुन विक्री करण्यास सांगितली. परंतु, सदरची रक्कम वादीकडे नसल्याने वादीने जिल्हाधिकारी, पुणे यांना मुदत वाढवुन मागितले असता सन २०१९ मध्ये वादीना जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडुन माहिती मिळाली की, नविन जीआर प्रमाणे ५० टक्के नजराणा भरुन दावा मिळकत भोगवटा वर्ग१ करु शकता. त्यावळी वादीने सदरची रक्कम बरीच मोठी असल्याने रकमेची जुळवाजुळव चालु केली असता दरम्यानच्या काळात सन २०२३ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीचे बेकायदेशिर वाटप प्रतिवादी क्र.३ व ४ यांना करुन दिल्याचे वादीला समजले. त्यानंतर वादीने सदरचा दावा दाखल केल्याचे नमुद केले.

०४. सदर प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे म्हणणेनुसार रजिस्टर दस्त नं.२२६३/२००६ अन्वये करुन दिलेल्या साठेखतामधील कलम ५चे अवलोकन केल्यास ''नंबर १ मध्ये वर्णन केलेली मिळकती नविन शर्तीची असल्याने सदर शर्त शासनाच्या परीपत्रकाप्रमाणे शर्त शेरा कमी करणे अगर नविन शर्तीची खरेदी विक्रीची परवानगी मिळाल्यानंतर सरकारी नियमाप्रमाणे खरेदीविक्रीचा व्यवहार आम्ही तुम्हास पुर्ण करुन द्यावयाचा आहे'' असे नमुद केले. त्यामुळे वादीने सन २०१७ साली जिल्हाधिकारी, पुणे यांनी निर्वानिकरणासंदर्भात ७५% नजराणा भरण्यास सांगितल्यानंतर सदरचा नजराणा भरुन सदर दावा मिळकतीचे भोगवटा वर्ग–१ करुन खरेदीखत करुन देणे गरजेचे होते. तसेच वादीने २०१७ साली नजराणा भरुन दावा मिळकतचे खरेदीखत करुन घेणे वादी व प्रतिवादी क्र.१ व ५ यांचेमधील साठेखतातील अटी व शर्तीप्रमाणे गरजेचे होते. परंतु, वादीने स्वतः ठरल्याप्रमाणे खरेदीखत करुन घेतले नसल्याने वादीने केवळ खोट्या स्वरुपाचे कारण दाखवुन सदरचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे वादीचे दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत असुन वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे फेटाळण्याची विनंती केली.

०५. सदर निशाणी ३६ वरील अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे निशाणी ४८ वर दाखल

केले. वादीचे म्हणणेनुसार सदर प्रतिवादींचा अर्ज खरा व प्रामाणिकपणाचा नसल्यामुळे तो त्यांना मान्य नाही. सदरचा अर्ज करण्यास कोणतेही खरे व कायदेशिर कारण घडले नसुन अर्जात दिलेले कारण खरे नसल्याने वादीला तो मान्य नाही. तसेच सदरचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबवण्याच्या हेतुने व उद्देशाने प्रतिवादीने दिलेला असुन सदरचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा.

०६. वादीचे म्हणणेनुसार सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेकामी दाखल केला असुन त्यांचेमध्ये व प्रतिवादी यांच्यादरम्यान झालेले रजि. साठेखत दस्त क्र.२२६३/२००६ हे पाहता दावा मिळकत ही भोगवटादार वर्ग–२ ची असल्याने साठेखत करण्यात आले आहे. तसेच सदर दाव्यात दावा मिळकतीची विक्री परवानगी आल्यानंतर किंवा दावा मिळकत भोगवटा वर्ग२ ची जमीन भोगवटा वर्ग१ ची झाल्यानंतर सदर मिळकतीचे खरेदीखत हे प्रतिवादीने वादी यांना करुन देतील व त्यात आडकाठी करणार नाहीत. सदर साठेखताने प्रतिवादी यांनी वादीला विकलेल्या दावा मिळकतीचा संपुर्ण मोबदला स्विकारलेला असुन सदर मिळकतीत प्रतिवादींचा कोणताही हक्क नाही अगर राहीलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीने दावा मिळकतीबाबत त्यांचे मुलामार्फत रे.मु.दावा क्र.४७/२०२३ हा खोटा दाखल करुन खोटी तडजोड केली जेणेकरुन वादीचा हिस्सा बळकावावा.

०७. सदर वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.१ व ५ यांना सदर मिळकत वादीला द्यायची नसुन स्विकारलेला मोबदला बुडविण्याच्या दुष्ट हेतुने त्यांनी दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे नावे रे.दि.मु.नं.४७/२०२३ या दाव्याचे तडजोडीने दि.११/०२/२०२३ रोजी केलेली आहे. सदरची बाब वादीला समजल्याने वादीने सदरचा दावा मुदतीत दाखल केला असुन त्यास मुदत कायद्याची बाधा येत नसल्यामुळे प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये रद्द करावा. वादीने जो दावा दाखल केला आहे तो संपुर्ण दावा प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये केलेल्या अर्जामध्ये मान्य केले असुन सदर प्रतिवादींनी दावा मिळकतीबाबत पुर्ण मोबदला स्विकारल्याची बाब, दावा मिळकतीचे साठेखत करुन दिल्याची बाब, प्रतिवादीने त्यांचे अर्जात मान्य व कबुल केल्याची बाब

नमुद केली. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रतिवादींना केस नसुन न्यायाचा तराजु वादीचे बाजुने आहे. तसेच प्रतिवादींनी केवळ विलंब करण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०८. वादीचे म्हणणेनुसार जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पमफ/कवि/८/२०१७ पुणे, दि.०५/०१/२०१७ अन्वये दावा मिळकतीची परवानगीबाबत वादीचा अर्ज मान्य करुन दावा मिळकतीच्या किंमतीच्या ७५ टक्के नजराणा रक्कम रु.६,३६,१६१/- रु. वादीला भरण्यास सांगितले. परंतु, एवढी रक्कम भरल्यानंतरही सदर मिळकत ही भोगवटा वर्ग२-चीच राहणार होती. त्यामुळे सदर रक्कम भरल्याने विक्री परवानगी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडुन दिली जाणार होती. त्यावेळी वादीला महसुल कार्यालयातुन माहिती मिळाली की, महाराष्ट्र शासनाकडुन भोगवटा वर्ग-२ च्या मिळकतीबाबत नविन धोरण स्विकारले जाणार असुन भोगवटा वर्ग-२ च्या मिळकती भोगवटा वर्ग-१ मध्ये रुपांतरीत केल्या जाणार असुन केवळ ५०% नजराणा भरुन घेतली जाणार आहे. सदरची बाब वादीला समजल्याने त्यांनी नजराणा रक्कम भरली नसल्याने सदर प्रकरण वादीने स्थगित ठेवल्याचे नमुद केले. सदर प्रकरण स्थगीत ठेवल्यामुळे त्याचा प्रतिवादींना कोणताही तोटा होणार नव्हता कारण प्रतिवादींनी दावा मिळकतीचा संपुर्ण मोबदला वादीकडुन सन २००६ साली स्विकारला होता. त्यामुळे सदर बाब विचारात घेवुन वादीने विक्री परवानगीबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे असलेले सदर प्रकरण प्रलंबित ठेवले. त्यांचे म्हणणेनुसार केवळ वादीला त्रास देण्यासाठी सदर प्रतिवादींनी प्रस्तुचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. करीता, वादीने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०९. प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी अर्ज निशाणी ४६ 'दिवाणी प्रक्रिया संहिता' आदेश ७ नियम ११(ड) अन्वये वादीचा दावा फेटाळण्याकरीता दाखल केलेला आहे. उपरोक्त निशाणी ३६ वरील अर्जातील तथ्य व मुद्दे सदर प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी प्रस्तुत अर्ज निशाणी ४६ मध्ये नमुद केले आहे. सदर प्रतिवादींचे म्हणणेनुसार वादीला दावा मिळकतीची परवानगी जिल्हाधिकारी यांचेमार्फत दि.०५/०१/२०१७ देण्यात आली होती. सदर परवानगी ही प्रतिवादी क्र.१ व ५

यांनी दि.२६/०२/२००९ रोजी दिलेल्या अर्जावरुन देण्यात आली होते. सदर वादीने परवानगीच्या अनुशंगाने दावा मिळकतीची ७५% नजराना रक्कम रु.६,३६,१६१/– ही त्यांचेकडे रक्कम उपलब्ध नसल्याने भरली नाही. सदर वादींना शासनाने रक्कम भरण्यास मुदत देवुनही वादीने नजराणा रक्कम भरली नाही. प्रतिवादींनी दि.०५/०१/२०१७ रोजी शासकिय परवानगी आणल्यानंतर ३ वर्षाच्या आतमध्ये वादीने रीतसर खरेदीखत करुन घेणे आवश्यक होते. परंतु, ते त्यांनी केली नाही, त्यामुळे सदर दाव्यास मुदत कायद्याची बाधा येत असल्याने सदर प्रतिवादींनी प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये फेटाळण्याची विनंती केली.

१०. सदर प्रतिवादींचे निशाणी ४६ वरील अर्जावर वादीने निशाणी ५५ वर म्हणणे दाखल केले. वादीने निशाणी ३६ च्या अनुशंगाने निशाणी ४६ वरील म्हणणे पुन्हा निशाणी ५५ वर दाखल केले. त्यामुळे सदर वादीचे म्हणणे पुनरोच्चारीत करण्याची आवश्यकता नाही. सदर वादीने प्रस्तुतचा प्रतिवादींचा अर्ज हा केवळ वादीचे हक्कात दावा मिळकतीचे खरेदीखत होवु नये याकरीता, प्रतिवादींनी दाखल केल्याचे नमुद करुन तो नामंजुर करण्याची विनंती केली.

११. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादींचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१)	वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये नामंजुर करणेस पात्र आहे काय?	**नकारार्थी...**
२)	आदेश काय?	**अर्ज नामंजुर...**

कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ व २ करिताः

१२. निशाणी ३६ व ४६ वरील अर्ज हे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये असल्याने दोन्ही अर्जांचे विवेचन एकत्रित देत आहे. तसेच दोन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रित देण्यात येत आहे. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेबाबत, जाहीर ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे.

१३. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादामध्ये त्यांचे अर्ज निशाणी ३६ व ४६ वरील अर्जातील मजकुर वाचुन दाखविला. तसेच त्यांचे म्हणणेनुसार सदर प्रकरणातील साठेखत हे सन २००६ साली झाले असुन वादीला दावा मिळकत जमिनीचा नजराणा भरण्याबाबत सन २०१७ साली आदेश मिळुनही वादीने तो भरला नाही व त्यामुळे सदरचे खरेदीखत विहीत वेळेत होवु शकले नाही. तसेच त्यांचे म्हणणेनुसार वादीने सदर खरेदीखत करुन देण्याकरीता उशीर होत असल्याने प्रतिवादींकडे मुदतीची मागणी केली नाही. त्यामुळे सदरचा दावा हा वादीने त्यांना शासनाची परवानगी मिळुनही दावा मिळकतीचे खरेदीखत वेळेत करुन घेतले नाही, त्यामुळे तो फेटाळण्यास पात्र असल्याचे नमुद केले.

१४. वादीचे विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादात त्यांचे निशाणी ४८ व ५५ वरील म्हणणे वाचुन दाखविले. त्यांचे म्हणणेनुसार सदरचा दावा हा प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या अनुशंगाने नि.दि. दावा क्र.४७/२०२३ दाखल करुन त्यामध्ये तडजोड केल्याने वादीला सदरचा दावा दाखल करणेस कारण घडले आहे. प्रतिवादींनी सदर वादीच्या दाव्यातील मजकुर नाकारला नाही. त्यामुळे त्यांनी सदरचे प्रतिवादींचे दोन्ही अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१५. सदर प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये सदरचा दावा हा कायद्याने चालणारा नसल्याने व त्याला मुदत कायद्याची मुदत बाधा येत असल्याने तो

नामंजुर करण्याची विनंती केली. त्या अनुशंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) चे अवलोकन केले.

१६. सदर प्रकरणात प्रतिवादींनी मुदत कायद्याबाबतचा आक्षेप घेतला आहे. त्यामुळे मुदत कायद्याच्या अनुशंगाने या ठिकाणी मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेसमोरील **अलताफ फकीर बेग वि. गोयल गंगा डेव्हलपर्स प्रथम अपील क्र.१८७५१/२०२१** न्यायनिर्णयाचा उहापोह करणे गरजेचे आहे. सदर प्रकरणातील तथ्यांचे अवलोकन केले असता न्यायालयासमक्ष असा प्रश्न उपस्थीत झाला की, संपरीक्षा करणारे न्यायालय हे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) च्या अनुशंगाने दावा मुदतीत नाही, या कारणास्तव खारीज करु शकतात काय? सदर न्यायनिर्णयामध्ये मुंबई उच्च न्यायालयाने विविध खटल्यातील न्यायनिर्णयांचा आधार घेवुन सदर दावा हा मुदतीत आहे किंवा नाही? हा तथ्य व कायदा हा संमिश्र प्रश्न असल्या (Mix question of fact and law) बाबतचा निष्कर्ष नोंदविला व त्याकरीता पुराव्याची आवश्यकता असल्याने दावा हा आदेश ७ नियम ११(ड) अन्वये रद्द करता येत नसल्याचे नमुद केले.

१७. प्रस्तुतचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन देण्याबाबत दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात वादी व प्रतिवादी क्र.१ व ५ यांच्यामध्ये साठेखत दस्त क्र.२२६३/२००६ हा नोंदणीकृत झाल्याचे अभीलेखावरुन दिसुन येते. तसेच सदर बाब ही दोन्ही पक्षांना मान्य आहे. सदर दावा मिळकत ही भोगवटादार वर्ग–२ ची असल्याने व त्या करीता शासनाची व वन विभागाची परवानगीची आवश्यकता असल्याबाबत साठेखताच्या दस्तामध्ये स्पष्टपणे उल्लेख आहे. सदरचे साठेखत हे बिनताबा असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसुन येते. साठेखतातील परीच्छेद क्र.८ चे अवलोकन केले असता वादीने संपुर्ण रक्कम प्रतिवादी क्र.१ व ५ यांना साठेखतावेळी दिल्याचे दिसुन येते. सदर साठेखत करताना त्यामध्ये परीच्छेद क्र.७ चे अवलोकन केले असता त्यामध्ये शासनाकडुन लागणारी परवानगी व नजराणा फी ही वादीने भरण्याचे ठरले होते, याबाबतचा मजकुर आहे. सदर प्रतिवादींचे म्हणणेनुसार वादीला जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडुन सन २०१७ साली सदर दावा मिळकतीच्या अनुशंगाने ७५%

नजराणा रक्कम भरण्याबाबत आदेशित करुनही ती वादीने भरली नाही व शासनाकडुन मुदत घेतली. परंतु सदर मुदतीबाबत प्रतिवादींकडे कोणतीही मागणी केली नाही. त्यामुळे प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा दावा हा वादीने त्यांना सन २०१७ साली परवानगी मिळाली असतानाही वादीने नजराणा रक्कम भरुन खरेदीखत करुन घेतले नसल्याने सदरचा दावा हा ३ वर्षाच्या आत दाखल केला नाही म्हणुन फेटाळण्याची विनंती केली आहे.

१८. सदरच्या दाव्यातील साठेखताचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादीने शासनाकडुन परवानगी मिळाल्यानंतर खरेदीखत करण्याबाबतचा मजकुर आहे. परंतु, परवानगी मिळाल्यानंतर किती काळामध्ये खरेदीखत नोंदवुन घ्यायचे याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. जरी प्रकरणात वादीला नजराणा भरण्याकरीता सन २०१७ मध्ये आदेशित केले असले तरी वादीने शासनाकडे मुदत मागितली होती. तसेच सदर रक्कम भरल्याशिवाय शासनाची परवानगी मिळाली व साठेखतातील अट पुर्ण झाली असे आजरोजी पुराव्याअभावी म्हणता येणार नाही. जोपर्यंत वादी नजराणा रक्कम भरत नाहीत, तोपर्यंत सदर साठेखतातील परवागीबाबतची अट पुर्ण झाली असे म्हणता येणार नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार परवानगी मिळाल्यानंतर ३ वर्षाच्या आत म्हणजेच सन २०२० साली वादीने दावा दाखल करणे गरजेचे होते. परंतु, वादीने तसे केले नाही. माझ्या मते सदर प्रकरणातील साठेखताचा दस्त व त्यातील खरेदीखत करुन देण्याबाबतच्या अटीकरीता वेळ हा महत्वाचा घटक होता काय? (Time was essence of contract) ही बाब सिध्द होणे गरजेचे आहे व त्याकरीता पुराव्याची आवश्यकता आहे.

१९. प्रतिवादींनी त्यांचे युक्तीवादापुष्टयर्थ मा. मद्रास उच्च न्यायालयातील **के. मुरली वि. एम. मोहम्मद शफीर MANU/TN/9073/2019** मधील न्यायनिर्णयाचा हवाला दिला. सदर प्रकरणातील न्यायनिर्णयाचे व तथ्यांचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणातील तथ्य व उपरोक्त न्यायनिर्णयातील तथ्य ही वेगवेगळी असल्याने सदरचा न्यायनिर्णय सदर प्रकरणात लागु होत नाही. महत्वाची बाब म्हणजे दावा मुदतीत आहे का? हा मुद्दा “Mixed question of fact and law” असल्याने त्याकरीता पुराव्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सदर प्रकरणात वादीचा

दावा हा मुदतबाह्य आहे हा प्रतिवादींचा युक्तीवाद दाव्याच्या या टप्यात ग्राहय धरता येणार नाही.

२०. उपरोक्त चर्चेवरुन सदर अर्जांच्या अनुशंगाने तथ्य व मुदतीच्या मिश्र प्रश्नाकरीता घेतलेल्या आक्षेपास पुराव्याची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रतिवादींचा सदरच्या अनुशंगाने घेतलेला आक्षेप गैरलागु होतो. उपरोक्त चर्चेवरुन सदरचा प्रतिवादींचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) मधील तरतुदींच्या अनुशंगाने सर्व कसोट्या पुर्ण करीत नसल्याने तो नामंजुर करणे न्यायोचित आहे. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदरचा अर्ज विनाखर्च नामंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या अनुशंगाने खालील आदेश पारीत करीत आहे –

आदेश

अर्ज निशाणी ३६ व ४६ नामंजुर करण्यात येत आहेत.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.03.01 11:05:57 +0530

ठिकाणः दौंड, **(एस.एन. पाटील)**

दिनांक २७/०२/२०२५ ३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दौंड, ता.दौंड, जि.पुणे

प्रमाणपत्र

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नांव	::	एम.एम. चिंतले,
न्यायालयाचे नांव	::	एस.एन. पाटील, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड ता.दौंड, जि.पुणे
निकाल दिनांक	::	२७/०२/२०२५
पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक	::	२७/०२/२०२५
निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक	::	०१/०३/२०२५